# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. :०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय:०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट:www.panvelcorporation.com


जा.क्र.पमपा/आस्था/२९२३/प्र.क्र.१३/८८८/२४

८.०३.२०२४
दि.~~२९/०२/२०२४~~

विषय :- पनवेल महानगरपालिकेने टि.सी.एस. द्वारे, दि.०८/१२/२०२३ ते दि.११/१२/२०२३ या कालावधीत **अग्निशमन सेवेतील** ५ संवर्गाकरीता घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेतील गुण व शारीरिक चाचणीतील (मैदानी क्षमता चाचणी) गुण एकत्र करुन पदनिहाय निवडसुची प्रसिद्ध करणेबाबत.

पनवेल महानगरपालिकेने टि.सी.एस. द्वारे, दि.०८/१२/२०२३ ते दि.११/१२/२०२३ या कालावधीत अग्निशमन सेवेतील ५ संवर्गाकरिता घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेमध्ये उमेदवारांना पदनिहाय प्राप्त झालेले गुण पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि.२०/०१/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहेत, तसेच शारिरीक चाचणीत उपिस्थित असलेल्या उमेदवारांना शारिरीक चाचणीत प्राप्त झालेले गुण पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिनांक २९/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

शारिरीक चाचणी (मैदानी क्षमता चाचणी) मध्ये प्राप्त गुण ऑनलाइन परिक्षेत मिळालेल्या गुणात अधिक करुन सामाजिक, समांतर आरक्षण व समान गुण असलेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेऊन अग्निशमन सेवेतील खाली नमुद ५ संवर्गाची पदनिहाय निवडसुची (प्रतिक्षा यादी सह ) याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे. ते संवर्ग खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | संवर्ग |
|---|---|
| १. | उप मुख्य अग्निशमन अधिकारी |
| २. | उप अग्निशमन अधिकारी |
| ३. | प्रमुख अग्निशमन विमोचक |
| ४. | अग्निशामक |
| ५. | ड्रायव्हर कम ऑपरेटर |

निवडसुचीनुसार निवड झालेल्या उमेदवाराने आपणांस दस्ताऐवज पडताळणीसाठी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे दस्ताऐवज तपासणीकरीता उपस्थित रहावे. जे उमेदवार दस्ताऐवज पडताळणीसाठी उपस्थित राहणार नाहीत, त्या उमेदवारांना निवडसुची मधून वगळण्यात येईल. दस्तऐवज पडताळणीसाठी हजर राहण्याचा दिनांक व वेळ निवडसूचीमधील उमेदवारास त्यांच्या वैयक्तिक Email ID वर पत्राव्दारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

सदर निवडसूचीमधील निवड झालेले उमेदवार विहित कालावधीत रुजू न झाल्यास व त्यांचा रुजु होण्यासाठी विहीत केलेला कालावधी संपुष्टात आल्यानंतर, प्रतिक्षायादीमधील पात्र उमेदवारांचा सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय / गुणानुक्रमे नियुक्तीसाठी विचार केला जाईल.

तसेच वरीलप्रमाणे प्रतिक्षायादीमधील निवड झालेले उमेदवार, त्यांना रुजू होण्यासाठी दिलेल्या विहीत कालावधीत रुजू न झाल्यास, यामुळे रिक्त राहिलेली पदे भरण्यासाठी उर्वरित पदनिहाय गुणवत्तायादी मधील पात्र उमेदवारांचा वरीलप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय / गुणानुक्रमे नियुक्तीसाठी विचार केला जाईल.

सदर निवडसूची दि.०७/०३/२०२४ पासून पुढील केवळ ०१ वर्ष कालावधीसाठीच म्हणजे दि.०६/०३/२०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत वैध राहील याची नोंद उमेदवारांनी घेण्यात यावी.

(गणेश देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

सोबत :- निवडसूची